


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!





संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७४९. वा | मंगळवार | दि. २३ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# महाराष्ट्राचं मुख्यमंत्रीपद हे क्रिकेट बोर्डाचं अध्यक्षपद नाही, अमित शहांवर का भडकले उद्धव ठाकरे?

वृत्तसंस्था/वर्धा

आज हे घराणेशाहीवर बोलत आहेत. ज्यांचे घराणे आहे, त्यांनी यावर बोलावे. अमित शहा आमच्या घरणेशाहीवर बोलतात. माझ्या मुलाला मुख्यमंत्री करायचे होते, म्हणून आम्ही युती केल्याचे सांगतात. पण, माझ्या मुलाला मुख्यमंत्री करायला त्यांच्या आशीर्वादाची गरज नाही. मुख्यमंत्रिपद म्हणजे क्रिकेट कंट्रोल बोर्डाचे अध्यक्षपद नाही,फ अशा शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. अमरावती लोकसभा मतदारसंघातील कॉँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखडे आणि वर्धा लोकसभा मतदारसंघातील उमेदवार अमर काळे यांच्या प्रचारार्थ सोमवारी ठाकरे यांच्या प्रचारसभा झाल्या. हिंगणघाटच्या टाका मैदानावर सायंकाळी झालेल्या सभेत ठाकरे बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, आपचे खासदार संजय सिंह, माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि इंडिया आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित होते. केजरीवाल यांनी दिल्लीत खूप चांगली कामे केली आहेत. दिल्लीतील नागरिकांनाही त्यांनी अनेक फायदे दिले आहेत. पण, मोदी सरकारच्या धोरणांवर टीका केली. त्याची किंमत मोजावी लागली आणि आता ते तुरुंगात आहेत,फ अशा वक्तव्य शरद पवार यांनी हिंगणघाटच्या सभेत केले. हे सरकार असेच राहिले तर एक दिवस सर्वसामान्यांचे जीवन उद्ध्वस्त होईल, याची मी खात्री देतो. राज्यघटनेने दिलेले अधिकार सुरक्षित नाहीत. राज्यघटनेने आपल्याला अधिकार आणि शासनाचा मार्ग दिला आहे, मात्र त्याला हात घालण्याची योजना आहे, असे शरद पवार म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी वर्ध्यात आले त्या दिवशी चैत्र एकादशी होती. त्यांनी रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी हा अभंग म्हटला. कुणी त्यांना लिहून दिला होता मला माहिती नाही. माझा विठ्ठल हा समोर बसलेला आहे आणि हे त्याचे रूप आहे. मोदी या जनतेत विठ्ठल आहेत, याचे रूप बघा. हा आनंदात आहे की नाही? आजवर तुमच्या सुखासाठी आम्ही झटलो आणि पदरामध्ये धोंडे पडले. गद्दारांना ५० खोके मिळाले. मी गेलो असतो तर मला किती मिळाले असते. पण, मला ते खोके नको आहेत. मला ही समोर बसलेली जनता पाहिजे आहे,असेही ठाकरे म्हणाले.





दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दिव्यांग व वृद्ध सन्मानाने करीत आहेत मतदान...

**जनसंचलन/ खामगांव**

लोकशाही मूल्य प्रति बांधिलकी दर्शवित मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य चोखपणे पार पडावे तसेच देशात सर्वत्र लोकशाहीचा उत्सव साजरा होत असताना यात दिव्यांग व वृद्ध मतदारांना सन्मानाने मतदान करता यावे यासाठी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ८५ वर्षावरील जेष्ठ नागरिक तसेच ४०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग मतदारांना पहिल्यांदा घरपोच मतदान करण्याचा हक्क मिळाला असून त्याची सुरुवात खामगांव येथून दि. २१ एप्रिल च्या सकाळी ७:३० वाजता पासून सुरू करण्यात आली असून यात विविध चमूकडून मतदान प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

कोणत्याही कारणामुळे एकही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेत दि.२१ रोजी अती दुर्गम आणि वनांच्छादित असलेल्या कोंती या गावात ट्रॅक्टरच्या सहाय्याने नदी पार करून मतदान अधिकारी,विजय रामकृष्ण निमकर्ड मायक्रो ऑब्झर्वर सचिन क्षीरसागर पोलीस कॉन्स्टेबल उमेश इंगळे व त्या गावचे केंद्रस्तरीय अधिकारी रामकृष्ण पानझडे यांनी श्री.गोपीचंद सदाशिव मोहिते वय ८६ यांना घरपोच मतदान




करण्याचा हक्क मिळवून देण्यात आला. खामगाव मतदार संघात खामगाव व शेगाव तालुका येत असून १२० जेष्ठ नागरिक ८३ दिव्यांग असे २०३ असून मतदारांसाठी २१ ते २३ एप्रिल दरम्यान मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. खामगाव विधानसभा मतदारसंघात मतपत्रिकेद्वारे घरून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १० पथके तयार करण्यात आली आहेत या पथकामध्ये मतदान केंद्र अध्यक्ष,मतदान अधिकारी,मायक्रो ऑब्झर्वर,पोलीस कर्मचारी,कॅमेरामन,व्हिडिओग्राफर तसेच एकूण १० वाहने कर्तव्य बजावत असून आज दि. २२ रोजी उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी,रामेश्वर पुरी यांच्या उपस्थितीत सप्तशृंगी अपार्टमेंट खामगाव येथील शुभदा चिंतामण खेरडे नामक दिव्यांग महिला यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असून यावेळी श्री.पुरी यांनी त्यांना पुष्प देऊन त्यांचा सत्कार केला व शुभेच्छा दिल्यात.यावेळी पोस्टल टपाली नोडल अधिकारी तथा ना. तहसीलदार विजय पाटील ज्येष्ठ नागरिकाचे पोस्टल मतदान चमू क्रमांक ५ पथकातील केंद्रस्तरीय अधिकारी जयेश पुखराज जैन,राहुल दीपकराव पाठक मायक्रोऑब्झर्वर नामदेव प्रभाकर झांबरे व कर्मचारी उपस्थित होते.

# महायुती महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४५ जागा जिंकणार -ना. उदय सामंत

**जनसंचलन/बुलडाणा**

महायुती महाराष्ट्र राज्यातील ४८ पैकी ४५ जागा जिंकणार असून त्यात बुलढाण्याचाही समावेश असल्याचा भरभक्कम दावा ना. उदय सामंत यांनी आज २२ एप्रिल रोजी येथे केला. मात्र त्यांनी बुलडाण्यातील अपक्ष उमेदवार रविकांत तुपकरांवर केलेली टीका, त्यावर भाष्य करताना घेतलेला वेळ, माध्यम प्रतिनिधींनाही चक्रावून टाकणारा टाकणारा ठरला. बुलडाण्यात प्रचाराचा आढावा घेण्यासाठी आलेले उदय सामंत यांनी आज सोमवारी स्थानिय पत्रकार भवन येथे प्रसिद्धी माध्यमाशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी केंद्रात चारशे पार तर राज्यात ४५ पार असे भाकित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दहा वर्षांत बजावलेली दमदार कामगिरी, देशाचा चौफेर विकास, जगात देशाची उंचावलेली मान, राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात झालेला विकास यामुळे महायुतीला हे घवघवीत यश मिळणार आहे. बुलडाणा मतदारसंघात ही प्रतापराव जाधव बहुमताने बाजी मारणार असा दावाही त्यांनी बोलून दाखविला. दरम्यान यानंतर ना. सामंत अनपेक्षित रित्या



अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर यांच्यावर घसरले. ते म्हणाले की, शेतकऱ्याच्या संदर्भात आंदोलन करायची आणी न्याय मिळाला की तो माझ्या मुळेच मिळाला, असे भासवायचे असा प्रकार बुलडाणा मतदारसंघात सर्रास सुरू आहे. बियाणे कंपन्या कडून कोट्यावधी रुपये उकळण्याचे धंदे सुरु असल्याचे ते म्हणाले. दादागिरीने पैसे उकळायचे काम सुरु असल्याचे त्यांनी तुपकर यांचा नामोल्लेख न करता केला. प्रतापराव जाधव यांच्या विरोधात निवडणुकीत असा शेतकरी नेता उभा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावर नावाची माध्यमांनी विचारणा केली असता त्यांनी तुपकरांचा उल्लेख केला. बुलडाणा मतदारसंघात जाधवांची लढत आघाडी की तुपकर यापैकी कुणा सोबत आहे? असे विचारले असता, त्यांनी जाधव यांचा विजय निश्चित असल्याचे सांगितले. दुसऱ्या क्रमाकासाठी अपक्ष रविकांत तुपकर आणि आघाडीचे नरेंद्र तुपकर यांच्यात लढत असल्याचे सांगितले.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com


लोकनेते विकास महर्षी बुलढाणा
मतदार संघाचे लोकप्रिय
मा.आ.
मा.विजयराज
शिंदे साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...!
संकल्प असावेत नवे तुमचे
मिळाव्यात त्यांना नव्या दिशा
प्रत्येक स्वप्न पूर्ण व्हावे तुमचे
आपणास वाढदिवसाच्या शुभेच्छा.
।। शुभेच्छुक ।।
श्री.एस.बी.निंबाळकर
श्री.जी.एस.राहणे
श्री.सी.एन.जाधव
श्री.पी.एम.बस्सी
कु.एम.एस.जगताप
कु.व्ही.डी.चव्हाण
कु.व्ही.पी.खोडके
श्री.जी.एस.घरडे
श्री.आर.एस जगताप
श्री.एन.टी.जाधव
श्री.व्ही.पी.गरुडे
प्राथमिक आश्रम शाळा
मोहेगांव ता.मोताळा जि.बुलढाणा


"शिखरे आनंदाची साहेब तुम्ही करीत रहावी ! मागे वळून पाहता आमच्या शुभेच्छा स्मरणात राहावी !"
लोकनेते
लोकनेते बुलढाणा मतदार संघाचे माजी आमदार तथा बुलढाणा लोकसभा प्रमुख
मा.विजयराज
शिंदे साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
प्रा.डॉ.भगवान गरुडे
जिल्हाध्यक्ष भाजपा
शिक्षक आघाडी बुलढाणा
मा.प्रा.श्री.शामभाऊ
सारवळीकर
प्रा.डॉ.गोविंद गायकी


हार्दिक शुभेच्छा!
लोकनेते, विकासमहर्षी बुलढाणा
मतदार संघाचे मा.लोकप्रिय आमदार
मा.आ.विजयराजजी
शिंदे साहेब
हार्दीक
शुभेच्छा!
शुभेच्छूक
सी.जे. धांडे ■ व्ही.जे. राजपूत ■ कु.एम.पी. डहाके
■ जी.एस. तांगडे ■ एन.आर. डोंगरदिवे
■ एस.डी. शेळे ■ प्रा.टी.ए.शेख ■ प्रा.व्ही.पी. महाले
■ प्रा.कु. के.व्ही. पाटील ■ यु.डी. खर्चे
■ एस.एस. मानकर ■ एम.एन. बावस्कर
■ कु.ए.जी. जिरे ■ आर.एन. डाबेराव
ए.एन.सोनोने
प्राचार्य
राजे छत्रपती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जयपूर

# फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांचे उमेदवार बाळासाहेब इंगळे लोकसभेच्या रिंगणात...

## आश्वासन देणार नसून तर बदल विकासाचा घडवून दारववणार- बाळासाहेब इंगळे

## जिल्हावासीयांना हवा आहे उच्चशिक्षित व सामान्यांना न्याय देणारा नवीन चेहरा...



जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा लोकसभा निवडणूक ही निवडणूक नसून तर एक प्राणप्रतिष्ठाची शर्यत सुद्धा समजले जात आहे. बुलढाणा लोकसभेच्या रणांगणामध्ये २१ उमेदवार हे उतरलेले आहे. यामध्ये काही पक्ष तर काही अपक्ष यांची ही लढत होणार आहे. बुलढाणा जिल्ह्याचे मतदान हे साध-ारण १८ लाखापर्यंत आहे. आता जिल्हावासीयांना नवीन चेहऱ्यासह विकास कामाची गती हवी आहे त्यामुळे बुलढाणा लोकसभा चे चित्र बदलण्याची दाट शक्यता आहे. बुलढाणा लोकसभेचा इतिहास राहिला आहे यामध्ये अपक्ष राहणाऱ्या उमेदवारांनी सुद्धा बाजी मार-लेली आहे त्यामुळे ही लढत कशी होणार हे बघावे लागणार आहे. आता या बुलढाणा लोकसभा निवडणुकीच्या रिंगणामध्ये बाळासाहेब रामचंद्र इंगळे हे उतरलेले आहे. उच्चशिक्षित ते आहे त्यामुळे बुलढाणा जिल्ह्याच्या विकासामध्ये त्यांची धडपड सुरूच असते. बाळासाहेब इंगळे हे फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांचे ते आहे सामान्य जनतेची जान त्यांना पहिल्यापासून आहे. बाळासाहेब यांचा परिचय प्रेम उर्फ बाळासाहेब रामचंद्र इंगळे असे त्यांचे नाव असून बॅचलर ऑफ कॉमर्स हे उच्च शिक्षण त्यांनी घेतले आहे. बुलढाणा जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच ध्येय ठेवून ते या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहे. आज पर्यंत बुलढाणा जिल्ह्याचा म्हणावा असा विकास झालेला नाही बुलढाणा जिल्ह्याला जागतिक नकाशावर ओळख निर्माण करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर लोणार सरोवर आहे महाराष्ट्राचे आर-ाध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे आगळ आणि माँसाहेब जिजाऊंचे माहेर सिंदखेड राजा बुलढाणा जिल्ह्यात आहे. हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक असणारे सैलानी बाबा तसेच महानुभव पंथाचे स्थान जाळीचा देव तसेच विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणारे श्री संत गजानन महाराज मंदिर शेगाव, देऊळगाव राजा येथील बालाजी मंदिर मेहकर येथील प्राचीन इतिहासाची ओळख सांगणारे कंचनी महाल बुलढाण्याला लाभलेले ज्ञानगंगा अभयारण्य खामगाव शहर आणि हल्लीच पुरातत्त्व विभागाने अशोककालीन बौद्ध स्तूप आणि अख्खे शहर उत्खनन करून बुलढाणा जिल्ह्यातील गोरेगाव येथे शोधून काढलेले आहे अशा एक नाही तर अनेक जमेच्या बाजू बुलढाणा जिल्ह्यात असून सुद्धा बुलढाणा जिल्ह्याचा हवा तसा विकास झालेला नाही. जिल्हा वासियांनी मला संधी दिल्यास या सर्वांचा विकास मी करून दाखविणार असे बाळासाहेब इंगळे यांनी सांगितले. कल्पकृती आणि सूजनात्मक विचार करणारे व्यक्ती बुलढाणा जिल्ह्याचा विकास करू शकते.त्यामुळे एक संधी द्यावी जिल्हावासियांनी मिळालेल्या संधीचा विकास करून दाखविणार...

## विकासाच्या बाबतीत जिल्हा कुठे आहे

विकासाच्या बाबतीत बघितले तर आपला बुलढाणा जिल्हा विकासाच्या बाबातीत खुप मागे गेला आहे.गेल्या कित्येक वर्षापासून जिल्हयाचा विकास हा रखडलेला आहे.युवा तरूण वर्गाच्या हातात रोजगार नाही आहे.रोजगारासाठी त्यांना बाहेर पुणे मुंबई अशा मोठ्या शहरात जावे लागत आहे.जिल्ह्यात आतापर्यंत कुठलेही एमआयडीसी आलेले नाही आहे.तसेच जिल्ह्यात असे अनेक ठिकाण आहे कि त्या ठिकाणचा विकास सुध्दा थांबलेला आहे.जिल्ह्यात जागतिक लोणार सरोवर आहे.विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणारी संत गजानन महाराजांची संत नगरी शेगाव,महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ माँसाहेब जिजाउ यांचे माहेर असलेले सिंदखेडराजा, देऊळगाव राजा येथील बालाजी मंदिर असे अनेक ठिकाणे आहे ज्या ठिकाणचा विकास हा थांबलेला आहे.त्यामुळे जिल्ह्याचा विकास झाला तर आपला जिल्हा हा खुप पुढे जाणार मात्र आता सध्या खुप मागे आहे

## निवडून आल्यावर हि असणार विकास कामांची गती...



बुलढाणा लोकसभेचे अपक्ष उमेदवार बाळासाहेब रामचंद्र इंगळे यांनी सांगितले की निवडूण आल्यावर माझ्या विकास कामांची गती अशा प्रकारे राहणार आहे. सर्व प्रथम बुलढाणा जिल्ह्याला जागतिक स्तरावरचे पर्यटन केंद्र बनविणार आहे. बुलढाणा जिल्ह्यात विमानतळ बनविणार आहे.बेरोजगार युवकांकरिता पर्यटनाच्या माध्यातून रोजग-ार व्यवसाय उपलब्ध करून देणार,बुलढाणा जिल्ह्यातील भोनगाव येथे उत्खननात सापडलेल्या अशोक सम्राट कालीन बौध्द स्तूप आणि शहरा-चे संवर्धन करून त्या ठिकाणाला जागतिक स्तरावरचे प्राचीन बौध्द पर्यटन स्थळ निर्माण करण्याचे नियोजन राहणार आहे.बुलढाणा जिल्ह्यात बारा महिने शेतीला आणि पिण्याला पाणी उपलब्ध व्हावे म्हणून पाण्याचे नियोजन करणार आहे.शेतकऱ्यांच्या मालाला किमान समर्थन मूल्य मिळावे म्हूणन प्रयत्न करणार आहे.बुलढाणा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शेतकऱ्यांना पूरक असे शेती उत्पादन,व्यवसाय यांची उभारणी करणार, तसेच बुलढाणा जिल्ह्यात तरूण पिढीसाठी विविध योजना तसेच तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी राहणार जेणे करून जिल्ह्यातील तरूण मंडळी यांना बाहेर पुणे,मुंबई,संभाजीनगर या ठिकाणी कामासाठी जावे लागणार नाही.
जिल्ह्यातच त्यांना रोजगार मिळणार ,जिल्ह्यासाठी विविध योजना राबविणार ज्यामुळे जिल्ह्याचा सर्वांगिण विकास होणार.जिल्ह्यात कित्येक वर्षापासून रखडलेला विकास हा पुर्ण करणार आहे.त्यामुळे जिल्हावासियांनी एक संधी द्यावी. संधी मिळाल्यास सर्व विकास कामे करणार असल्याचेअपक्ष उमेदवार श्री बाळासाहेब रामचंद्र इंगळे यांनी दैनिक जनसंचलन व सिटी न्युजशी बोलतांना सांगितले आहे

## माझा विकास कार्य असा असणार



बुलढाणा जिल्ह्यामध्येच जर शिक्षण संस्था असत्या आणि रोजगाराच्या संधी असत्या तर या युवक आणि युवतींना जिल्ह्याच्या बाहेर जाण्याची अजिबात गरज नव्हती. बुलढाणा जिल्ह्यात घाटाखाली अनेक गावांना पाण्याचे दुर्भिक्ष आहे. मी बुलढाणा जिल्ह्या मध्ये असलेल्या विविध धार्मिक सांस्कृतिक प्राचीन अति प्राचीन ऐतिहासिक स्थळांचे योग्य ते संवर्धन करून त्याचा अशा प्रकारे विकास करणार जेणेकरून बुलढाणा जिल्हा जागतिक स्तरावर चे पर्यटन केंद्र व्हावे बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक यावे म्हणून येथे विमानतळाची उभारणी व्हावी बुलढाणा जिल्हा जर जागतिक स्तरावरचे पर्यटन केंद्र बनले तर या ठिकाणी आपसूकच रोजगार आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील शेततळ्याने ऐवजी पाण्याचे नियोजन कल्पक रित्या केले तर प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी जाऊ शकते पांढरा सोनं पिकवणारा आमच्या बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी आज हवालदिल झालेला आहे त्याच्या उत्पादनाला किमान समर्थन मूल्य मिळावे म्हणून प्रयत्न करणार तसेच प्रत्येक तालुक्यात फूड प्रोसेसिंग आणि शेतीपूरक व्यवसाय ची उभारणी केली जाईल जेणेकरून शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळाला नाही तर तो फूड प्रोसेसिंग युनिटच्या माध्यमातून आपल्या उत्पादनाचे योग्य मूल्य मिळवू शकतो.त्यामुळे असे कामे विकास झाल्यास जिल्ह्याची जनता व शेतकरी वर्ग व्यापारी वर्ग सुध्दा यांना आनंदाचे दिवस येणार

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958